SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००
Meeting & Elections Section
Phone No. – (0231) 2609130
Email ID :- meeting@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

क्रमांक: शिवाजी वि./निवडणूक/२२/ No 0 0 1 6 3 दिनांक : 07 JUL 2022

निवडणूक अतितात्काळ

प्रति,

१. मा.अध्यक्ष /संचालक,
सर्व विद्यापीठ संलग्नित मान्यताप्राप्त संस्था.

२. मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय: अधिसभेच्या व विद्यापरिषदेच्या तसेच अभ्यास मंडळाच्या निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करणेसाठी माहिती पाठविणे बाबत.

संदर्भ :1.No.SU/ELE/2022/CollegeTeacher/00552 दिनांक 16 जून,2022 रोजीचे या कार्यालयाचे पत्र.
2.No.SU/UE/2022/BOS/00556 दिनांक 16 जून, 2022 रोजीचे या कार्यालयाचे पत्र.
3.No.SU/UE/2022/PRINCIPAL/00550 दिनांक 16 जून,2022 रोजीचे या कार्यालयाचे पत्र.
4.No.SU/ELE/2022/RM/00553 दिनांक 16 जून,2022 रोजीचे या कार्यालयाचे पत्र.
5.क्रमांक: शिवाजी वि./निवडणूक/22/01008 दिनांक 30 जून, 2022 रोजीचे या कार्यालयाचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये अधिसभेच्या निवडणुकीसाठी प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी व महाविद्यालयीन शिक्षक तसेच विद्यापरिषदेच्या निवडणुकीसाठी महाविद्यालयीन शिक्षक त्याचप्रमाणे अभ्यास मंडळाच्या निवडणूकीसाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांची मतदार यादी तयार करणेसाठी, माहिती ऑनलाईन स्वरूपात दिनांक ७ जुलै, २०२२ पर्यंत भरण्यासाठी व सदर ऑनलाईन भरलेली माहिती आवश्यक कागदपत्रासह विद्यापीठ कार्यालयाकडे दिनांक ११ जुलै, २०२२ पर्यंत पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अद्याप सदर मागणी केलेली माहिती काही महाविद्यालयांकडून / संस्थेकडून प्राप्त झालेली नाही.

कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये या हेतूने महाविद्यालयीन शिक्षक, महाविद्यालयीन विभागप्रमुख, प्राचार्य व व्यवस्थापन प्रतिनिधी यांची माहिती ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठ संकेतस्थळावर भरण्यासाठी **दिनांक ११ जुलै,२०२२** पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे तसेच सदर ऑनलाईन भरलेली माहिती आवश्यक कागदपत्रासह विद्यापीठ कार्यालयाकडे **दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत** सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

प्रत्येक पात्र मतदारास मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी उपरोक्त मुदतवाढ अवलोकनी घेवून उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ४ पत्रान्वये मागणी केलेप्रमाणे या कार्यालयास माहिती विहित वेळेत पाठवावी. तसेच यानंतर माहिती सादर करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

डॉ.व्ही.एन.शिंदे
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी